# सोलापूर महानगरपालिका

म.न.पा.
लोगो

जाक्रसआस/कक्ष.१/आस्था.९/२४६
सामान्य प्रशासन विभाग
सोलापूर दि.१८/०८/२०११

## -: जाहिर प्रसिध्दीकरण :-

सोलापूर महानगरपालिका संचलित मराठी माध्यम व उर्दू माध्यमाच्या प्रशालेकडे खालील शिक्षक (शिक्षण सेवक) व शिक्षकेतर पदे भरावयाची आहेत.

तक्ता (अ)

| अ.क्र. | पदाचे नांव | माध्यम | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक मराठी (स्पेशल), | मराठी | बी.ए./एम.ए. (मराठी), बी.एड (मराठी-इतिहास) | २ | अ.जमाती-०१<br>खुला-०१ |
| २ | शिक्षण सेवक हिंदी (स्पेशल), | मराठी | बी.ए./एम.ए. (हिंदी), बी.एड (हिंदी-भुगोल) | ३ | विमाप्र -०१<br>इमाव-०१ (महिला)<br>खुला-०१ (अस्थिव्यंग- One Leg Affected) |
| ३ | शिक्षण सेवक इंग्रजी (स्पेशल), | मराठी | बी.ए./एम.ए. (इंग्रजी) बी.एड (इंग्रजी-भुगोल) | १ | खुला |
| ४ | शिक्षण सेवक इंग्रजी (स्पेशल), | मराठी | बी.ए./एम.ए. (इंग्रजी), बी.एड (इंग्रजी-इतिहास) | १ | खुला (महिला) |
| ५ | १) मराठी (स्पेशल), | मराठी | बी.ए./एम.ए (मराठी) बी.एड (मराठी- भुगोल) | १ | खुला |

तक्ता (ब)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | शिक्षण सेवक इंग्रजी (स्पेशल), | उर्दू | बी.ए./एम.ए. (इंग्रजी), बी.एड (इंग्रजी-मराठी) (एस.एस.सी.मध्ये व्दितीय भाषा १०० गुणाची मराठी आवश्यक ) | १ | अनुसूचित जमाती |
| ७ | शिक्षण सेवक भूगोल (स्पेशल), | उर्दू | बी.ए./एम.ए. (भुगोल), बी.एड (भुगोल-उर्दू) | १ | विमुक्त जाती (अ) (महिला) |

तक्ता (क)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | शिक्षण सेवक शारीरीक शिक्षण (स्पेशल) | मराठी | बी.एससी., बी.पी.एड./ बी.ए., बी.पी.एड | १ | खुला |

**सूचना :-**

१) उपरोक्त नमूद तक्ता 'अ' व 'क' मध्ये नमूद केलेल्या आरक्षणानुसार पदे भरावयाची आहेत.

२) उपरोक्त नमूद तक्ता उर्दु माध्यम ' ब ' मधील नमूद केलेल्या आरक्षणानुसार मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन निर्णयानुसार खुल्या प्रवर्गातून पदे भरणेत येतील

३) उमेदवारांनी महानगरपालिकेच्या छापील नमुन्याच्या अर्जामध्ये अर्ज करावयाचे आहेत. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जावर पदाचे नांव लिहिणे आवश्यक आहे.

४) वेतन :-

अ) सदर शिक्षण सेवकांची नियुक्ती ही मा.शासन निर्णय क्र.एसएमएम१०९९/(३४०/९९) माशि-२ दि.१३ ऑक्टोंबर, २००० नुसार शिक्षण सेवक या पदावर तीन शैक्षणिक वर्षे (मराठी माध्यम, उर्दू माध्यम व शारिरीक शिक्षण शिक्षक शिक्षण सेवक एकवट मानधन रु.४०००/-) अर्थात किमान ३ (तीन) वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवारास प्रशाला सेवेचा अहवाल पाहून त्यानंतर त्यांची रितसर लागू वेतनश्रेणीमध्ये नियुक्ती करण्यात येईल.

५) वयोमर्यादा दि.०१/०८/२०११ रोजी.

* खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी-१८ ते ३३ वर्षे
* मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी -१८ ते ३८ वर्षे
* अपंग प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी - १८ ते ४५ वर्षे

६) छापील नमुन्याचे अर्ज दि.१८/०८/२०११ **पासून** ते दि.०६/०९/२०११ पर्यंत सकाळी १०.०० ते दुपारी ०१.३० पर्यंत सहाय्यक आयुक्त (स) यांचे कार्यालय, इंद्रभुवन, सोलापूर महानगरपालिका येथे, खुल्या प्रवर्गासाठी र.रु.०५/- व मागासवर्गीय उमेदवारासाठी र.रु.०३/- इतके शुल्क भरुन मिळतील.

७) छापील नमुन्याचे अर्जाची अंतिम विक्री दि.०६/०९/२०११ रोजी दुपारी ०१.३० पर्यंत राहील.

८) भरलेले अर्ज दि. ०७/०९/२०११ **रोजी सायंकाळी** ०५.०० पर्यंत सहाय्यक आयुक्त (स) यांचे कार्यालय, सोलापूर महानगरपालिका येथे स्वीकारण्यात येतील.

९) छापील अर्ज पोस्टाने पाहिजे असल्यास संबंधितांनी आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर या नावाने रक्कम रु.०५/- खुल्या प्रवर्गासाठी व रक्कम ०३.०० रुपये मागासवर्गीयांसाठी पोस्टल ऑर्डरसह व सोबत उमेदवाराचा पूर्ण पत्ता असलेला लिफाफा योग्य त्या पोस्टेजसह पाठवून विनंती केल्यास अर्जाचा फॉर्म पोस्टाव्दारे पाठविण्यात येईल. तसेच संबंधितानी मुदतीत अर्ज पोहोच होतील यांची जबाबदारी संबंधितावर राहील. मुदतीतनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## <u>सर्वसाधारण अटी</u>

१) महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र.बीसीसी/२००९ /प्र.क्र./२९१/०९/१६ब दि.०५/११/२००९ नुसार मागासवर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांने त्यांचे जाती वैधता प्रमाणपत्र नियुक्तीपुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

२) मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.०१ जुलै २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञापत्र नमुना 'अ' नुसार उमेदवाराने सादर करावयाचे आहे.

३) संबंधित उमेदवाराची चारित्र्य प्रडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करुन त्यांच्याविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविण्यात आला नाही अथवा गुन्हा सिध्द झालेला नाही, तसेच शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी संबंध नाही. असे प्रमाणपत्र निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीपुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

४) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरतीप्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना आहेत.

५) मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही.

६) तक्ता "अ","ब","क" मधील पदांसाठी- शासन धोरणानुसार मान्यताप्राप्त संस्थेतून MS-CIT/ D.O.E.A.C.C. हि संगणक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. नसल्यास शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि.१९/०३/२००३ अन्वये सदर संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा नियुक्ती संपुष्टात आणणेत येईल.

७) अर्ज करताना उमेदवाराने जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची <u>साक्षांकित</u> प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची <u>सांक्षाकिंत</u> प्रत जोडणे आवश्यक आहे.

८) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. याबाबत रहिवास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९) महाराष्ट्रा व्यतिरिक्त अन्य राज्यातून अध्यापन पदविका/पदवी/शिक्षणशास्त्र पदविका धारण करणाऱ्या उमदेवारांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

१०)शारीरिक दृष्टया राखीव पदावरील नियुक्तीसाठी संबंधित प्रवर्गाचे किमान ४० टक्के अपंगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सक/सक्षम वैद्यकीय मंडळ/सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचे साक्षांकित प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

११) अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेचे दाखले, गुणपत्रिका व अनुभवाच्या दाखल्याचा **प्रमाणित केलेल्या सत्यप्रती (साक्षांकित)** जोडणे आवश्यक आहे. (शिक्षण सेवक पदासाठी अर्ज करणारे उमेदवारांनी एस.एस.सी., एच.एस.सी., बी.ए./एम.ए., बी.एड/एम.एड च्या **गुणपत्रिकांची** सत्यप्रती **(साक्षांकित)** प्रत जोडणे आवश्यक आहे)

१२) विहीत पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज, अपुर्ण वा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता तसेच फोटो नसलेले, अर्जावर स्वाक्षरी नसलेले, खाडाखोड केलेले, विसंगत माहिती असलेले अर्ज अपात्र समजले जातील. अपात्र ठरलेल्या अर्जाच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार

१३) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णयानुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१४) शिक्षण सेवक म्हणून नियुक्त केलेल्या उमेदवारास दैनंदिन शालेय उपक्रमांतील तसेच शासन निर्णयातील नमूद केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

१५) उपरोक्त पदासाठी परिक्षा अथवा मुलाखतीचा कार्यक्रम अंतिम करण्याचा अधिकार मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना राहील.

**विशेष सुचना:-**

१) यापुर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच सोलापूर महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादीचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

२) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारणा करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द बातल होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

३) जाहिरातीमध्ये नमूद अनुशेष हा रोष्टर तपासणीच्या अधिन राहून असून, त्यात शासन निर्णयानुसार बदल झाल्यास प्रवर्ग बदलण्याचे अधिकार मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना राहतील.

४) उपरोक्त सर्व सुचना/विशेष सुचना/अटी संबंधिताने वाचले आहेत, असे प्रशासन गृहित धरीत आहे.

सदर जाहीर प्रसिध्दीकरण सोलापूर महानगरपालिकेच्या www.solpaurmunicipal.com या वेबसाईटवर वरही प्रसिध्द करणेत आलेले आहे.

* उपरोक्त जाहीर प्रसिध्दीकरण हे वेळोवेळी प्रसारीत होणारे शासन निर्णय, सुचना, आदेशाच्या अटीस अधिन राहील.

sd/-

आयुक्त

सोलापूर महानगरपालिका,सोलापूर